ARTHA
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WT. HOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख २१ नोव्हेंबर, १९५६ | अंक ४४

## विविध माहिती

**लोहचुंबकाचा उपयोग करणारी यारी**—मुंबई येथील अलेक्झांड्रा डॉकमध्यें लोहचुंबकाचा उपयोग करणारी एक नव्या प्रकारची फिरती यारी बसविण्यांत आली आहे. भारतीय बंदरांत अशा प्रकारची ही पहिलीच यारी असून तीसाठी ६५,००० रुपये किंमत पडेल अशी अपेक्षा आहे. लोखंड व पोलादाचें सामान भारतांत अलीकडे मोठ्या प्रमाणावर येत आहे. तें उतरून घेण्यास ह्या यारीचा विशेष उपयोग होईल.

**११ लाख रुपये नुकसानभरपाई**—ता. १ सप्टेंबर रोजीं सिकंदराबाद–द्रोणाचलम् ह्या उतारूंच्या गाडीला अपघात होऊन १२५ माणसें प्राणास मुकलीं होतीं. अपघातानें ज्यांचें नुकसान झालें आहे अशा लोकांनीं रेल्वे क्लेम्स कमिशनरकडे नुकसानभरपाईसाठीं अर्ज केले आहेत. आतांपर्यंत ११ लाख रुपये नुकसानभरपाई दाखल मागण्यांत आले आहेत.

**आगगाडींत सिनेमाची सोय**—हौरा–दिल्ली जनता एक्स-प्रेस गाडीवर सिनेमा दाखविण्याची सोय करण्यांत आली आहे. भारतीय रेल्वेवर हा उपक्रम प्रथमच करण्यांत येत आहे. सिनेमा दाखविण्यासाठीं खास बांधलेला डबा झाशी ते कानपूर ह्या ४०० मैलांच्या अंतरापुरताच जोडण्यांत येईल. एका वेळीं ६० प्रेक्षक सिनेमा बघूं शकतील. तिकिटाचा दर अवघा दोन आणे आहे.

**रेल्वेच्या एंजिनांची मागणी**—भारतीय रेल्वे-बोर्डानें चित्तरंजन एंजिनांच्या कारखान्याकडे रुंद रुळावर चालणाऱ्या उतारूंची गाडी ओढणाऱ्या ३० एंजिनांची मागणी नोंदविली आहे. ह्या कारखान्यांत तयार होणारीं रेल्वेचीं एंजिनें मुख्यतः मालाच्या गाड्यांसाठीं तयार करण्यांत येतात. उतारूंची गाडी ओढणारीं एंजिनें आतांपर्यंत परदेशांतून आयात केलीं जात आहेत.

**खेळाडूंच्या दौऱ्याच्या फायद्यांत घट**—चालू वर्षी इंग्लंडमध्यें गेलेल्या ऑस्ट्रेलिअन क्रिकेट संघाला ४२,००० पौंड फायदा होईल असें जाहीर करण्यांत आलें आहे. १९५३ सालीं संघाला ६९,६०० पौंड फायदा झाला होता. इंग्लंडमधील दौऱ्याच्या वेळीं नेहमींपेक्षा अधिक पाऊस झाल्याचा हा परिणाम आहे.

**रशिआंत प्राचीन देऊळ**—रशिआंतील बाकू शहरापासून कांहीं मैल अंतरावर एक प्राचीन भारतीय देऊळ आढळून आलें आहे. देवळाच्या परिसरांत असलेल्या खोल्यांच्या भिंतीवर संस्कृत व गुरुमुखी भाषेंतील कांहीं मजकूर खोदलेला आहे. त्यावरून १८ व्या शतकांत तेथें भारतीय लोक रहात असावेत असें वाटतें. पण तेवढ्यावरून देऊळ भारतीय मानण्यास तज्ज्ञ तयार नाहींत.

**नवें एंजिनिअरिंग कॉलेज**—पार्लमेंटचे सभासद मि. अकबर-अली खान ह्यांनीं पं. नेहरूंच्या ६७ व्या वाढदिवसाच्या दिवशीं हैदराबाद येथें निघणाऱ्या नव्या एंजिनिअरिंग कॉलेजसाठीं सात एकर जमीन आणि ५०,००० रुपये अशी देणगी जाहीर केली आहे. दात्याचा मनोरथ पूर्ण करण्यासाठीं व देणग्यांची व्यवस्था पहाण्यासाठीं ट्रस्ट निर्माण करण्यांत येईल.

**मातीच्या भांड्यांचा धंदा**—खेडेगांवांतील मातीचीं भांडीं तयार करण्याच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं भारतीय सरकारनें एक योजना मंजूर केली आहे. ग्रामीण भागांतील कुंभारांना मदत देणें, त्यांच्याकडून नवीन प्रकारचीं भांडीं तयार करवून घेण्या-साठीं त्यांना शिक्षण देणें, ह्या गोष्टींचा अंतर्भाव योजनेंत करण्यांत आला आहे. ह्या कामासाठीं खादी व ग्रामोद्योग-बोर्डाला ७·८ लाख रुपयांची मदत देण्यांत आली आहे.

**स्वीडनची साह्याची तयारी**—तांत्रिक अनुभवाची देवाण-घेवाण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत स्वीडननें दोन भारतीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची तयारी दाखविली आहे. मोठ्या आंकड्यांचीं गणितें करणाऱ्या यंत्रांची निर्मिति करण्याचें शिक्षण ह्या विद्यार्थ्यांना देण्यांत येईल. शिक्षणाचा कालावधी अंदाजें ९ महिन्यांचा राहील.

**लोकर साफ करण्याचा कारखाना**—पोरबंदर येथें कच्ची लोकर साफ करण्याचा कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं १० लाख रुपयांचें भांडवल लागेल. कारखाना चालू झाल्यावर साफ केलेल्या शुद्ध लोकरीच्या आयातीचें प्रमाण बरेंच कमी होईल. शिवाय भारतामधील कच्ची लोकरहि देशांतच साफ करण्यांत येईल. भारतामधून दरसाल ५ कोटी रुपये किंमतीची कच्ची लोकर निर्यात करण्यांत येते.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# विद्यमान राज्यें, वारसदार राज्यें व त्यांच्या वांटणीची लोकसंख्या

मध्यवर्ती गृहखात्यानें भारताच्या १७ ऑक्टोबरच्या जादा गॅझेटांतील एका हुकुमान्वयें राज्य पुनर्रचना कायद्याच्या दुसऱ्या कलमानुसार विद्यमान राज्यांची लोकसंख्या अनेक वारसदार राज्यांमध्यें प्रादेशिकदृष्ट्या वांटून देण्याचें प्रमाण जाहीर केलें आहे.

विद्यमान राज्यांची लोकसंख्या कोणत्या प्रमाणावर वांटून देण्यांत येईल तें पुढें दिलें आहे :—

| विद्यमान राज्यें | वारसदार राज्यें व लोकसंख्येचें प्रमाण |
|---|---|
| मुंबई | मुंबई ८५·५७; म्हैसूर १४·२८; राजस्थान ०·१५. |
| हैदराबाद | आंध्रप्रदेश ५७·६४; मुंबई २७·७९; म्हैसूर १४·५७. |
| मध्यभारत | मध्यप्रदेश ९९·६२; राजस्थान ०·३८. |
| मध्यप्रदेश | मध्यप्रदेश ६४·२०; मुंबई ३५·८०. |
| मद्रास | मद्रास ८१·४०; केरळ १४·४३; म्हैसूर ४·११; संघराज्य ०·०६. |
| राजस्थान | राजस्थान ९९·३७; मध्यप्रदेश ०·६३. |
| त्रावणकोर-कोचीन | केरळ ९०·४५; मद्रास ९·५५. |

## कच्छमधील घरबांधणी

कच्छमधील ग्रामीण भागांत घरें बांधण्यासाठी भारतीय सरकारनें २० लाख रुपयांची रकम मंजूर केली आहे. रकमेचा उपयोग करून सुमारें २,००० घरें बांधण्यांत येतील. कच्छमध्यें नुकत्याच झालेल्या भूकंपांत घरांची बरीच पडझड झाली आहे. भूकंपांत नादुरुस्त झालेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी १,३०,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

## डनलॉप कंपनीचा विस्तार

डनलॉप कंपनीनें भारतामधील आपल्या कारखान्यांचा विस्तार करण्याच्या कांहीं महत्त्वाच्या योजना आखल्या आहेत. कलकत्त्याजवळील सहागंज येथील कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविण्यांत येणार आहे. त्याशिवाय मद्रासजवळ एक संपूर्ण नवा कारखानाच काढण्याचें घाटत आहे. कारखान्यासाठी जागेची पहाणी चालू आहे.

## पाकिस्तानची संकल्पित बँक

पाकिस्तानचें सरकार शेतीचें उत्पन्न वाढविण्यास उत्तेजन देण्यासाठी एक शेतकी बँक काढण्याचा विचार करीत आहे. शेतीचा विकास, मालाचीं गुदामें, व मालाची विक्री, इत्यादि कामासाठीं बँक कर्ज देईल. बँकेचें भांडवल २० कोटी रुपयांचें असेल. मध्यवर्ती सरकार भाग भांडवलापैकीं कमींत कमी ५१ टक्के भाग-भांडवल धारण करील.

## कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जें

भारताच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ३० जून, १९५६ अखेर संपलेल्या वर्षांत निरनिराळ्या धंद्यांच्या विकासासाठीं १५ कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ह्या तारखेपर्यंत कॉर्पोरेशननें एकूण १५४ कारखान्यांना कर्जें दिलीं. सर्व कर्जांची रक्कम ४३·२० कोटी रुपये आहे.


स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन



'अर्थ' ग्रन्थमाला


१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



शेंगा

या यंत्राकडून दर तास ७५ ते ८० पोतीं फोडलीं जात असून चालविण्यास ६ ते अश्वशक्ति लागते. शिवाय लहान प्रमाण हातानें व पॉवरवर णारीं यंत्रें मिळतात.

सविस्तर माहिती लिहा.



"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र

# अर्थ

बुधवार, ता. २१ नोव्हेंबर, १९५६





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखाने

महाराष्ट्रांत स्थापन होत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांमुळें मागासलेल्या ह्या प्रदेशाच्या आर्थिक उन्नतीस महत्त्वाचा हातभार लागत आहे आणि लहान शेतकऱ्यांचें शेतमजुरांत होत असलेलें रूपांतर त्यामुळें थांबलें आहे. लिमिटेड कंपन्यांनीं चालविलेले साखर कारखाने जमिनी विकत घेऊन किंवा भाडेपट्ट्यानें घेऊन त्यांत ऊंस लावीत. आणखी अशा कारखान्यांची स्थापना झाली असली, तर त्या प्रदेशांतील लहान शेतकऱ्यांच्या उद्धाराची आशाच उरली नसती. मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखान्यांविषयींच्या आपल्या लेखांत* श्री. पुं. वा. वर्दे ह्यांनीं वरील मत व्यक्त केलें आहे. सहकारी कारखान्यांच्या प्रगतीचे कामीं श्री. वर्दे ह्यांचें नेतृत्व महत्त्वाचें कार्य करीत आहे, ह्याची वाचकांना जाणीव आहेच.

१९५० सालीं प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखाली ५०० टनांचा पहिला सहकारी साखर कारखाना नगर जिल्ह्यांत स्थापन झाला. त्याच्या यशामुळें नव्या सहकारी कारखान्यांच्या स्थापनेस जोराची चालना मिळाली. मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटनें मुंबई राज्य सरकारला सहकारी साखर कारखान्यांचें महत्त्व पटवून अशा कारखान्यांस प्रोत्साहन देण्याचें सरकारनें धोरण ठेवावें असें सुचविलें. नव्या साखर कारखान्यांना परवाने देतेवेळीं सहकारी तत्त्वावरील कारखान्यांनाच प्राधान्य मिळावें, अशी इन्स्टिटयूटची सूचना होती. त्याप्रमाणें, मुंबई राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारला शिफारस केली. मध्यवर्ती सरकारचा निर्णय सहकारी चळवळीला अनुकूल असाच झाला. मुंबई सरकारच्या १२ जून, १९५४ रोजींच्या प्रेसनोटनें जाहीर केलें, कीं हें राज्य सरकार सहकारी साखर कारखान्यांना विशेष मदत देईल व त्यांच्या शेअर भांडवलालाहि हातभार लावून त्यांचा पाया भक्कम करील.

सरकारच्या ह्या अनुकूल धोरणामुळें सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेस इष्ट असें वातावरण निर्माण झालें. उत्पादक शेतकऱ्यांनीं मिळून १० ते १५ लक्ष रुपयांचें भांडवल प्रथम उभारावें; त्यानंतर राज्य सरकारनें स्वतः शेअर भांडवल द्यावें आणि त्यानंतर इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ४० ते ४५ लक्ष रुपयांचें दीर्घ मुदतीचें कर्ज द्यावें, अशी योजना ठरविण्यांत आली. म्हणजे, ८००/१,००० टनांच्या कारखान्याच्या ९० लक्ष ते १ कोटी रुपये भांडवलाची व्यवस्था झाली. शेतकऱ्यांनीं प्रत्येक एकरामागें १,००० रु. चा शेअर घ्यावा, असेंहि ठरलें.

शेतकऱ्यांनीं ह्याखेरीज कारखान्यांत गाळण्यासाठीं आणल्या जाणाऱ्या उसास त्यांच्या प्रत्येक एक टनामागें एक रुपया द्यावा, त्याचा एक फंड सांठविण्यांत यावा व त्यांतून इंडस्ट्रिअल फिनॅन्स कार्पोरेशनचें कर्ज भागविण्यांत यावें, असेंहि ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें, स्वतःच्या बचतीमधूनच मोठा साखर कारखाना शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीचा होणार आहे. ग्रामीण विभागांत भांडवलाचा संचय अप्रत्यक्ष रीतीनें होण्याचा हा उत्कृष्ट मार्ग आहे.

* बॉंबे को. कार्टर्ली, ऑक्टोबर १९५६.

अहमदनगर, कोल्हापूर, पुणें, सातारा, नाशिक, सुरत, ह्या जिल्ह्यांतून सहकारी साखर कारखाने नोंदण्यांत आले आहेत आणि कांहीं आणखी कारखान्यांच्या योजना सरकारचे पुढें आहेत. प्रवरानगर खेरीज आणखी एका कारखान्यांत आत साखर निघूं लागली असून पांच कारखाने येत्या मोसमांत सुरू होतील अशी अपेक्षा आहे.

सर्व सहकारी साखर कारखान्यांचें एक फेडरेशन ( सहकारी साखर कारखाना संघ लि. ) स्थापण्यांत आलें असून त्यामुळें कारखान्यांच्या अनेक अडचणी दूर होण्यास व त्यांचेपुढील प्रश्न दूर होण्यास मदत झाली आहे. सर्व कारखान्यांची खरेदी, साखरेची विक्री, उपपदार्थांच्या निर्मितीचा चांगल्या तऱ्हेनें विनियोग, निर्गत बाजारपेठांची पहाणी, इत्यादि कामें फेडरेशनला हातीं घेतां येतील.

### श्री. मुळजी ह्यांचा इशारा

दि डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनची १७ वी वार्षिक सभा नुकतीच भरली होती, त्यावेळीं श्री. जयंतीलाल जे. मुळजी ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सहकारी साखर कारखान्यांविषयीं व्यक्त केलेले विचार वरील आशादायक चित्राशीं विसंगत असे आहेत व त्यांचें रहस्य लक्षांत घेणें आवश्यक आहे. श्री. मुळजी म्हणाले, कीं प्रवरानगर येथील सहकारी साखर कारखान्याचें ‘ यशस्वी सहकारी कारखाना ’ म्हणून नेहमीं उदाहरण दाखविलें जातें. पण कांहीं विशिष्ट परिस्थिति व बाजारांतील तात्कालिक तंगी ह्यांचा फायदा त्या कारखान्याच्या स्थापनेचे वेळीं मिळाला. ही परिस्थिति आतां पूर्णपणें पालटली आहे. आजच्या बाजारभावानें, साखर कारखान्याच्या उभारणीस एक कोटि रुपयांचें भांडवल लागेल व त्या गुंतवणुकीचे मानानें व्याज सुटणें शक्य नाहीं. कोपरगांव येथें नव्यानें निघालेल्या कारखान्याच्या वार्षिक अहवालाचा श्री. मुळजी ह्यांनीं मुद्दाम उल्लेख केला. “ ह्या कारखान्यानें सुमारें १ लक्ष रुपयांचा तोटा दाखविला आहे. हा कारखाना ९ लक्ष रुपयांचा घसारा काढण्यास पात्र असतांना, त्यानें फक्त २·८२ लक्ष रुपयांचाच घसारा काढलेला आहे. कर्जावरील देणें व्याज नफा-तोटा पत्रकांत दाखल न करतां त्या रकमेनें जिंदगी वाढविण्यांत आलेली आहे. सहकारी साखर कारखान्यांना इन्कमटॅक्सची माफी आहे; त्याचप्रमाणें कामगारांना भारी दरानें मजुरी द्यावी लागत नाहीं व त्यांच्या सुखसोईवर खर्चहि करावा लागत नाहीं. म्हणून ह्या नव्या सहकारी साखर कारखान्यानें दाखविलेल्या आर्थिक निष्कर्षावरून सरकारनें बोध घेतला पाहिजे. आणखी सहकारी साखर कारखान्यांत पैसे गुंतविण्याऐवजीं ते दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चास उपलब्ध करणें फायद्याचें ठरेल. सार्वजनिक पैसा सहकारी साखर कारखान्यांत धोका पत्करून गुंतविण्याऐवजीं, हें काम सरकारनें खासगी भांडवलदारांकडे सोंपवावें; तें काम करण्यास त्यांची तयारी व सिद्धता आहे. ”

### हातमागाच्या कापडाची निर्यात

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीं जो पैसा उभारावा लागेल त्यांत परदेशीय हुंडणावळीच्या संभाव्य उपलब्धीला महत्त्वाचें स्थान आहे. कारण, औद्योगिक दृष्ट्या अधिक प्रगत असलेल्या देशांना भारतीय माल निर्यात करूनच भारताला जरूर ती हुंडणावळ मिळवितां येईल. परदेशांकडून मिळणारें कर्जाचें प्रमाणहि कांहीं अंशीं भारताच्या निर्यातीच्या शक्तीवर अवलंबून आहे. अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. युजिन ब्लॅक ह्यांना लिहिलेल्या पत्रांत परदेशीय हुंडणावळीचें महत्त्व मान्य केलेलें आहे. त्याचप्रमाणें ती मिळविण्याच्या कांहीं मार्गांचा उल्लेखहि त्यांनीं आपल्या पत्रांत केला आहे. भारत निर्यात करीत असलेल्या वस्तूंत कापड ही एक वस्तु आहे. हातमागावर निर्माण करण्यांत येणाऱ्या कापडाच्या कांहीं प्रकारांनाहि परदेशांत चांगली मागणी येते. उत्तर अमेरिकेंत हातमागाच्या कापडाची निर्यात वाढविण्यासाठी काय उपाय योजावे तें सुचविण्यासाठी भारतीय सरकारनें अमेरिकन तज्ज्ञांचें साह्य मागितलें होतें. सरकारच्या विनंतीप्रमाणें तीन अमेरिकन तज्ज्ञ भारताचा दौरा करण्यासाठी आलेले आहेत. हातमागावर सध्यां तयार होणाऱ्या कापडाच्या प्रकारांपैकी कोठले प्रकार निर्यातीस योग्य आहेत, अमेरिकेंतील गिऱ्हाइकांची आवड लक्षांत घेऊन कोणते नवीन प्रकार उत्पादन करणें आवश्यक आहे, त्याचप्रमाणें तयार झालेल्या मालाच्या विक्रीची व्यवस्था काय करावी, इत्यादि प्रश्नांबद्दल हें तज्ज्ञांचें मंडळ भारतीय सरकारला सल्ला देणार आहे. सल्लागार तज्ज्ञांत एक कारखानदार, एक कापडगिरणी एंजिनिअर आणि खेळाच्या वेळीं घालावयाच्या पोषाखाविषयीं सल्ला देणारी एक स्त्री-विक्रेती आहे. गेल्या दोन वर्षांत भारतीय हातमागावर तयार झालेल्या कापडाविषयीं अमेरिकेंत बरेंच औत्सुक्य दिसून येत आहे.

---

### इंटरनॅशनल राइस कमिशनची बैठक

कलकत्ता येथें इंटरनॅशनल राइस कमिशनची पांचवी बैठक भरली होती. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतीविषयक उपसंघटनेचे डायरेक्टर जनरल श्री. बी. आर. सेन ह्यांनीं बैठकीच्या उद्घाटनाचें भाषण केलें. ते म्हणाले कीं आग्नेय आशिआंतील बहुसंख्य लोकांचें जीवन शेतीच्या व्यवसायावर अवलंबून आहे. पण अगदीं अलीकडच्या काळापर्यंत ह्या विषयाकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत येत होतें. ह्या भूमागांतील कित्येक देशांना शेकडों वर्षांनंतर राजकीय स्वातंत्र्याचा लाभ झालेला आहे. तथापि हें राजकीय स्वातंत्र्य म्हणजे कांहीं साध्य नव्हे. आग्नेय आशिआंतील लोक अत्यंत दरिद्री आहेत. त्यांचें जीवनमान अधिक समृद्ध करण्याचें साधन म्हणून राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग आहे. म्हणून ह्या भागांतील राष्ट्रीय सरकारांनीं आपल्या जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याकडे जास्तींत जास्त लक्ष देण्यास सुरुवात केलेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतीय सरकारनें देशांतील तांदुळाचें उत्पादन वाढविण्याच्या कामीं चांगलें यश मिळविलें आहे. भारताप्रमाणेंच जपान, व्हिएटनाम, कांबोडिआ व सयाम ह्या देशांनींहि तांदुळाचें उत्पादन वाढविण्यासाठी उत्साहानें काम करण्यास सुरुवात केली आहे. राइस कमिशन ह्या प्रयत्नांना फार महत्त्व देतें. कारण, आग्नेय आशिआंतील लोकांचा मुख्य आहार तांदुळावरच आधारलेला आहे. लोकसंख्या सध्याच्याच गतीनें वाढत गेल्यास सुमारें शंभर वर्षांत ती हल्लींच्या दुप्पट होईल; अन्न व शेतीविषयक संघटनेनें लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याच्या उपायांचाहि विचार करणें आवश्यक आहे.


## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. देवेंद्र आपया मंगाज कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

### १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# हिंदी बँकांचा परदेशांतील व्यवहार

हिंदी बँकांच्या प्रगतीचे आंकडे समाधानकारक वाटत असले, तर त्यांच्या परदेशांतील व्यवहारासंबंधीं मात्र उत्साहवर्धक परिस्थिति आढळत नाहीं, असेंच म्हणावें लागेल.

फाळणीनंतर हिंदी बँकांच्या परदेशांतील शाखांची संख्या दरसाल उतरत चालली होती. १९५५ मध्यें मात्र त्यांत दोहोंची वाढ होऊन ती संख्या १०८ झाली. पाकिस्तान वगळून बाकीच्या देशांतील व्यवहार वाढला, तरी पाकिस्तानांतील व्यवहारांत फारच मोठी घट झाली. एकट्या पाकिस्तानांतच परदेशी व्यवहारांपैकी निम्मा व्यवहार चालतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे पीछेहाटीची कल्पना येईल. १९५५ मध्यें एकूण विदेशी व्यवहारांत अशा रीतीनें घटच अनुभवास आली.

१९५५ मध्यें परदेशांत व्यवहार करणाऱ्या हिंदी बँकांची संख्या वाढली नाहीं आणि ज्या देशांत त्या व्यवहार करतात, त्या देशांचीहि संख्या वाढली नाहीं. १९५५ अखेर, २६ शेड्यूल्ड व ६ बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या परदेशांत अनुक्रमें ९९ व ९ कचेऱ्या होत्या.

हिंदी बँकांच्या परदेशांतील ठेवींत ५·१ कोटी रुपयांची घट झाली; १९५४ मध्यें २·१ कोटी रुपयांची वाढ झाली होती. डिमांड ठेवी ५३·४ कोटी रु. वरून ४८·४ कोटी रु. वर आल्या. ठेवी कमी झाल्यामुळें, त्या प्रमाणांत भारतांतील मुख्य कचेरीकडून पैसे नेऊन परदेशांत गुंतवावे लागले.

जिंदगीपैकी, रोकड, इतर बँकांतील शिलक, कॉलमनी, इत्यादींत ७० लाखांची घट झाली. परंतु, त्याहिपेक्षा अधिक प्रमाणांत ठेवी कमी झाल्यामुळें लिक्विड जिंदगीचें ठेवींशीं प्रमाण २४% चें २४·८% असें सुधारलें. परदेशांतील कचेऱ्यांचा हुंडीचा व्यवहार वाढत आहे, ही एकच गोष्ट समाधानास जागा देणारी आहे. एकूण इन्व्हेस्टमेंटपैकीं निम्मी रक्कम पाकिस्तानी सरकारी रोख्यांत होती.

पाकिस्तानांतील इतर बँकांकडील ठेवींत वाढ होत असतांना, हिंदी बँकांच्या पाकिस्तानांतील कचेऱ्यांचा अनुभव मात्र उलट आहे. त्यांचेकडील ठेवींत १०·३ कोटी रुपयांची घट होऊन त्या २७·० कोटी रुपयांवर आल्या. १९५४ मध्यें फक्त १·८ कोटी रुपयांचीच घट झाली होती.

हिंदी बँकांचा ब्रह्मदेशांतील व्यवहार थोडा सुधारला. त्यांचेकडील ठेवींत २ कोटी रु. ची भर पडून त्यांची रक्कम १२·८ कोटी रु. झाली.

चार हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या प्रत्येकी १ ह्याप्रमाणें ४ कचेऱ्या युनायटेड किंग्डममध्यें आहेत. त्यांचेकडील ठेवींत ४१ लक्ष रु. ची भर पडून त्यांची रक्कम ६·२ कोटी रु. झाली.

### हिंदी बँकांचीं परदेशांतील देणीं–येणीं
( १९५५ अखेर : लक्ष रुपये )

| | ब्रि. पूर्व आफ्रिका | बर्मा | सिलोन | मलाया | पाकिस्तान | युनायटेड किंग्डम | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| माहिती पुरविणाऱ्या बँका ... | २ | ५ | ३ | ४ | २७ | ४ | ३ | ३० |
| कचेऱ्यांची संख्या ... | ८ | ९ | ३ | १२ | ६६ | ४ | ६ | १०८ |
| **देणीं** | | | | | | | | |
| ( १ ) डिमांड ठेवी ... | १,५५ | ९,८३ | ६,४८ | ३,८२ | १९,७५ | ५,३७ | १,५८ | ४८,३७ |
| ( २ ) टाइम ठेवी ... | ५५ | २,९५ | १,४७ | २,६१ | ७,२३ | ८७ | ४२ | १६,१० |
| ( ३ ) एकूण ठेवी ... | २·१० | १२,७८ | ७,९५ | ६,४३ | २६,९८ | ६,२४ | २,०० | ६४,४८ |
| ( ४ ) इतर बँकांस देणीं ... | — | — | ५ | ५ | १,४० | — | १० | १,६१ |
| ( ५ ) शाखा अॅडजस्टमेंटस ... | ३,११ | — | ४५ | १,३६ | ३,९५ | २,५८ | १,५२ | १२,९७ |
| ( ६ ) इतर देणीं | ६० | ५७ | ३७ | १,१४ | १,२२ | २,३९ | ९० | ७,१७ |
| ( ७ ) एकूण ... | ५,८१ | १३,३५ | ८,८२ | ८,९८ | ३३,५५ | ११,२० | ४,५२ | ८६,२४ |
| **येणीं** | | | | | | | | |
| ( ८ ) रोख ... | २१ | १८ | २९ | १६ | ९४ | २ | १५ | १,९३ |
| ( ९ ) इतर बँकांत, कॉल मनी, इ. ... | २९ | ३,१० | २,१० | ८३ | ३,४३ | ३,७४ | ५८ | १४,०६ |
| (१०) कॅश रेशो ( ८+९ )चें ३ शी % ... | २३·८ | २५·७ | ३०·१ | १५·४ | १६·२ | ६०·३ | ३६·५ | २४·८ |
| (११) विदेशी रोख्यांत गुंतवणूक ... | — | ४,६७ | ३,६१ | ६९ | ८,६० | १,९९ | ५ | १९,६३ |
| (१२) इतर गुंतवणूक ... | — | १,०९ | — | — | ७० | १ | — | १,७९ |
| (१३) (११+१२) चें ३ शी % ... | — | ४५·१ | ४५·४ | १०·७ | ३४·५ | ३२·१ | २·५ | ३३,२ |
| (१४) बिल्स ... | १,६७ | ३६ | ७३ | ४,५३ | २,२२ | २,५७ | २,५२ | १४,५९ |
| (१५) कर्जें ... | ३,१३ | १,१३ | ४९ | १,७१ | १४,९९ | ५६ | ३६ | २२,३७ |
| (१६) (१४+१५) चें ३ शी % ... | २२८·६ | ११·७ | १५·३ | ९७·० | ६३·८ | ५०·२ | १४४·० | ५७·३ |
| (१७) शाखा अॅडजस्टमेंटस ... | — | २-५३ | १,११ | ९ | ३४ | १५ | ४ | ४,२६ |
| (१८) इतर देणीं ... | ५२ | ३० | ५० | ९८ | २,३३ | २,१७ | ८१ | ७,५९ |
| (१९) एकूण ... | ५,८१ | १३,३५ | ८,८२ | ८,९८ | ३३,५४ | ११,२० | ४,५२ | ८६,२३ |

सिलोनमध्यें तीन हिंदी बँक कचेऱ्या आहेत. त्यांचेकडे ८ कोटी रु. च्या ठेवी आहेत. मलायांत आठ हिंदी बँकांच्या १२ कचेऱ्या असून त्यांचेकडील ठेवी ५·३ कोटी रु. च्या ६·४ कोटी रु. झाल्या.

ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंत १९५५ मध्यें दारेसलाम येथें बँक ऑफ इंडियानें नवी कचेरी उघडली. १९५५ अखेर तेथें बँक ऑफ इंडियाच्या ५ व बँक ऑफ बरोडाच्या ३ शाखा होत्या. ठेवी १·० कोटी रु. च्या २·१ कोटी रु. वर गेल्या.

एडन, हाँगकाँग, जपान व थाइलँड येथें मिळून हिंदी बँकांच्या ५ कचेऱ्या होत्या, त्यांत इंडियन ओव्हरसीज बँकेच्या हाँगकाँग कचेरीची भर पडली. ठेवी २ कोटी रुपयांच्या आहेत.

### चहा निर्गत करणाऱ्या प्रमुख देशांची निर्गत

( लक्ष पौंड )

| | ईशान्य भारत | दक्षिण भारत | सिलोन | इंडो-नेशिया | पूर्व आफ्रिका | चीन |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | ३४०२ | ६०१ | २९८१ | ६२५ | २९० | २५० |
| १९५१ | ३५९४ | ६३५ | ३०५२ | ८८२ | ३०१ | २४० |
| १९५२ | ३३८९ | ७२१ | ३१४५ | ७०२ | २९९ | १२० |
| १९५३ | ४२१२ | ७५३ | ३३५६ | ६३६ | २६४ | १९० |
| १९५४ | ३६२८ | ७७६ | ३५६१ | ८८५ | ३७६ | ३२० |
| १९५५ | २९१५ | ६७५ | ३५७३ | ६४४ | ३८७ | उपलब्ध नाहीं |

### वाचनालयासाठी नवी इमारत

उस्मानिआ विद्यापीठाच्या वाचनालयासाठी आधुनिक पद्धतीची एक नवी इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतीसाठी १२ लाख रुपये खर्च येईल. वाचनालयांत सध्यां १,२०,००० पुस्तकें आहेत. त्यांपैकी ६,००,००० पुस्तकांची व्यवस्था नव्या इमारतींत होईल. युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशननें इमारतीच्या खर्चापैकी ८ लाख रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

### रशिअन प्रवाशांचा दौरा

सोव्हिएट रशिआंतून भारतांत आलेल्या हौशी प्रवाशांची एक तुकडी तीन आठवड्यांच्या दौऱ्यावर आहे. ह्या तुकडींत ५६ प्रवासी आहेत. त्यांतील १५ स्त्रिया आहेत. डॉक्टर्स, कवी, एंजिनिअर्स, विद्यार्थी, कामगार, इत्यादि प्रकारचे लोक प्रवाशांत आहेत. रशिआंतून भारतांत आलेल्या प्रवाशांचा हा पहिलाच गट आहे.

### ताडगुळाच्या धंद्याला मदत

भारतीय सरकारनें ताडगुळाच्या धंद्याचा विकास करण्याची एक योजना मान्य केली आहे. ताडगुळाचें उत्पादन करण्यासाठी लागणारें तांत्रिक ज्ञान कामगारांना देण्यांत येणार आहे. ताडगुळाचें उत्पादन करणाऱ्या सहकारी संस्था काढण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें त्याच्या विक्रीचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे.

### भारतांमधील चहाचा वाढता खप


१९५४-५५ ह्या सालीं भारतांत १८·३ कोटी पौंड चहाचा खप झाला होता. देशांत चहाचा खप वाढत चाललेला दिसून येतो. १९५५-५६ सालीं चहाच्या खपानें २०·६ कोटी पौंडांची मर्यादा गांठली असें आढळून आलें आहे.

### रशिआंतील प्रगतीचें दर्शन

मुंबईचे मिल्क कमिशनर श्री. डी. एन. खुरोडी हे रशिअन सरकारच्या आमंत्रणावरून त्या देशाच्या धांवत्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनीं रशिआंत १७ दिवस प्रवास केला व जें अवलोकन करतां आलें तें केलें. आपल्या प्रवासाची हकीकत मुंबई येथील रोटरी क्लबच्या सभेंत सांगतांना ते म्हणाले, कीं गेल्या चाळीस वर्षांत रशिआनें बरीच प्रगति केली असली तरी समृद्धीच्या अवस्थेला पोंचण्यास अजून पुष्कळ काळ लागेल. बहुतेक लोकांची अशी कल्पना आहे कीं रशिआंत निवर्गीय समाज स्थापन करण्याचें कार्य पूर्ण झालें आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. महिनाअखेर मिळणाऱ्या वेतनांत खूप तफावत आहे. रस्ते झाडणाऱ्या झाडूला ४०० रुपये दरमहा मिळतात, तर नाट्यगृहांत नाचणाऱ्या कसबी नर्तिकेला दरमहा ४०,००० रुपये मिळतात. पगाराचे आंकडे मोठे वाटतात खरे; पण किंमतीकडे लक्ष दिलें तर त्यांची खरी क्रयशक्ति लक्षांत येते. लोणी व खारा खवा ह्यांची किंमत पौंडाला १२ रुपये द्यावी लागते. भाड्याच्या टॅक्सीचा दर मैलाला २ रुपये असा आहे. चांगली दुभती गाय विकत घ्यावयाची झाल्यास ७,००० रुपये मोजावे लागतात, चांगल्या कापडाच्या कोटासाठीं ५०० रुपये पडतात. संपूर्ण सूट करावयाचा तर १,१०० रुपयाखालीं तो होत नाहीं आणि बूट घ्यावयाचें झाल्यास १०० ते ३०० रुपयांपर्यंत किंमत द्यावी लागते. सामुदायिक शेतीनें मात्र बरीच प्रगति केलेली दिसून येते. रशिआंत ८०,००० सामुदायिक शेतें आहेत आणि त्यावर २ कोटी शेतकरी आपली गुजराण करतात. कार्यक्षमतेच्या दृष्टीनें मात्र सरकारी मालकीचीं शेतें उजवी ठरतात. रशिआंत केस कापण्याचीं दुकानें सुद्धां सरकारी मालकीचीं आहेत.

**रेडिओद्वारां ध्वनिक्षेपणाची सामुग्री**—भारतीय सरकारनें रशिआकडून फिरत्या ध्वनिक्षेपणाच्या केंद्रांसाठीं लागणारी यंत्रसामुग्री विकत घेण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय १२ टन वजनाच्या डिझेल तेलावर चालणाऱ्या तीन ट्रक्स व इतर कांहीं यांत्रिक साहित्यहि खरेदी करण्यांत येणार आहे. सर्व साहित्यासाठीं भारताला ३·५ लाख रुपये द्यावे लागतील.

**मद्रासचा दूधपुरवठा**—मद्रास शहरांतील दाट वस्तीच्या भागांतील दुभत्या गुरांचे गोठे शहराबाहेर हलवून तेथें एका दूधनगराची स्थापना करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १२३ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. वसाहतींत जंतुविहीन दुधाच्या बाटल्या भरण्याचा कारखानाहि खोलण्यांत येणार आहे.



सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना- १९१८.
सारस्वत बँक बिल्डिंग,
गिरगांव, मुंबई.४.
राष्ट्राकरितां बचत करा.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,५८,४००
रिझर्व..........रु. ६,९७,०००
ठेवी............रु. १,५२,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार
केले जातात.

## चहा कंपन्यांवर अचानक आघात

कोयमतूर (कोईमतूर) च्या खास औद्योगिक त्रिनिर्णायकांनीं दिलेला निर्णय २४ ऑक्टोबरच्या फोर्ट सेंट जॉर्ज गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला आहे. त्याअन्वयें मद्रासकडील सर्व चहा, कॉफी, वेलदोडे इ. काढणाऱ्या कंपन्यांना आपल्या मजुरांना जादा सरासरी साडेछपन्न टक्के वेतनवाढ द्यावी लागणार आहे. इतकेंच नव्हे तर ती २४ मार्च १९५२ या कालापासून मोजून द्यावी लागणार आहे. आणखीसुद्धां कांहीं सोयी द्याव्या लागणार आहेत. यामुळें मद्रासकडील सर्व चहादि कंपन्या हादरून गेल्या असून, घाबरलेल्या गुंतविणारांची शेअर्स विकून टाकण्याची, मिळेल त्या भावांत, गर्दी उसळलेली आहे. हा घबराट थोपविण्याच्या दृष्टीनें मद्रास शेअर बाजारनें आठ नोव्हेंबरचे बंदभाव किमान ठरवून टाकले आहेत.

लागवडी कंपन्यांमध्यें चहाउत्पादकांचें आधिक्य आहे, व चहा निर्यात हा आपला मोठा परदेशी हुंडणावळ मिळवून देणारा निर्यात व्यापार आहे. प्राप्तीकर, शेतकीकर, एक्साइज ड्यूटी इत्यादि अनेक रूपांनीं सरकारला या धंद्यापासून मोठें उत्पन्न मिळतें.

तेव्हां या असल्या अचानक हातपाय तोडून टाकणाऱ्या निर्णयांनीं सरकारचें तसेंच मजुरांचें कोठलेंहि हित साधणार नाहीं. जर निर्णय अमलांत आला तर कांहीं कंपन्यांना जादा रकमा किती भराव्या लागतील याचे आंकडे उपलब्ध झाले आहेत.

| | भांडवल व निधि | निर्णयामुळें देणें |
|---|---|---|
| किलकोटागिरी | रु. १६ लाख | रु. १९ लाख |
| पेरियाकरमलाई | रु. ७६ लाख | रु. ४८ लाख |
| ओ. ही. (१९३८) | रु. ४३½ „ | रु. ३६ „ |

याचा अर्थ, नाणावलेल्या जुन्या कंपन्यांसुद्धां संपूर्णतया बंद करण्याची वेळ येईल. इतर कंपन्यांचे हाल तर कुत्रा खाणार नाहीं.

या निर्णयाविरुद्ध कंपन्यांनीं सुप्रीम कोर्टाकडे अर्ज केलेला आहे व तात्पुरती निर्णयबंदी मिळण्याची शक्यता आहे. (सुप्रीम कोर्टानें कंपन्यांना अपील करण्याची स्पेशल लीव्ह दिली आहे.) मुंबई शेअरहोल्डर असोसिएशननेंहि याबद्दल सरकारकडे जोराचा निषेध प्रदर्शित केला आहे. मजा ही कीं, कलकत्त्याकडे याबाबत अजून कसलीच मजुरांची हालचाल नाहीं. पण ती येणार नाहीं असें सांगतां येत नाहीं.

तसेंच इतर उद्योगांतील मजूर याच धर्तीवर सवलती काढण्याचा प्रयत्न करणार नाहींत, असेंहि सांगता येणार नाहीं व सर्वत्रच अनवस्था प्रसंग दिसतो.

तेव्हां या बाबतींत मध्यवर्ती सरकारला मध्यें पडावेंच लागून कांहींतरी तडजोडीचा मार्ग काढावा लागेल असें दिसतें. कारण असें न करण्यांत धोका सगळ्यांनाच आहे.

तेव्हां सरकार काय करतें आहे तें पाहिल्याशिवाय गुंतविणारांनीं घाबरून चांगले शेअर्स मातीमोलानें विकण्याची घाई करूं नये असें वाटतें; आणि घेणाराहि कुणी सध्यां भेटेल याची खात्री नाहीं.

व. वि. लोणकर, पुणे ५.

**पोलादाची आयात**—चालू वर्षअखेरपर्यंत भारतांत ११० कोटी रुपये किंमतीचें पोलाद आयात होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. एकूण १८ लाख टन पोलाद आयात करण्यांत येईल. त्यांपैकी १३ लाख टन सप्टेंबर अखेर भारतांत आलें आहे. बाकीचें डिसेंबर अखेरपर्यंत येईल.

## उत्पादन-मंत्र्यांच्या परदेशांचा दौरा

भारतीय सरकारचे उत्पादनमंत्री श्री. के. सी. रेड्डी चार आठवडे मुदतीच्या परदेशांच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत रशिआ, पश्चिम जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, स्वित्झरलंड आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्या देशांतील नाना प्रकारचे कारखाने पाहिले आणि भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कारखाने उभारण्याच्या कामीं हे देश कोणते व कसे साह्य देऊं शकतील ह्याविषयीं त्यांनीं त्या त्या देशांच्या प्रतिनिधींशीं विचारविनिमय केला. श्री. रेड्डी ह्यांनीं आपल्या दौऱ्यांत ५० मोठमोठ्या कारखान्यांचें अवलोकन केलें. अवजड प्रकारचे एंजिनिअरिंगचे कारखाने, यांत्रिक हत्यारांचे कारखाने, तेल शुद्ध करण्याचे कारखाने, खताचे कारखाने, रासायनिक कारखाने, बोटी बांधण्याच्या गोद्या, कोळशाच्या खाणी, इत्यादि प्रकारच्या औद्योगिक कारखान्यांना त्यांनीं भेटी दिल्या. हे कारखाने पाहून झाल्यावर अशाच प्रकारचे कारखाने भारतांत काढण्यासाठी जें तांत्रिक ज्ञान लागेल त्याबद्दलहि त्यांनीं चर्चा केली. भारतांत अशा प्रकारचे कारखाने काढल्यावर ते चालविण्यासाठी भारतीय तज्ज्ञांची जरूरी लागणारच. अर्थातच, हिंदी तंत्रज्ञांना शिकवून तरबेज करण्यासाठी परदेशीय कारखान्यांच्या चालकांना सवलती देणें आवश्यक आहे. बहुतेक सर्व देशांनीं अशा सवलती देण्याचें कबूल केलें असल्याचें समजतें. सोव्हिएट रशिआ व इतर कांहीं देश ह्यांनीं भारताच्या संकल्पित कारखान्यांना लागणारें यंत्रसाहित्य दीर्घ मुदतीच्या उधारीवर देण्याचें कबूल केल्याची वार्ता आहे. अशा प्रकारचें सर्वांत मोठें कर्ज रशिआनें देऊं केलें आहे. औद्योगीकरणासाठी लागणारी सामुग्री अशा रीतीनें मिळाल्यास भारताच्या परदेशीय हुंडणावळीवरील ताण कमी होईल.


**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

भांडवल

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी वगैरे | रु. | ८,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७,००,००,००० |

★

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)

श्री. न. ग. पवार — श्री. मा. वी. शहा

श्री. धों. कृ. साठे — श्री. भा. म. गुप्ते

श्री. मा. रा. जोशी — श्री. म. बा. जांभेकर

श्री. फ. दो. पद्मजी — श्री. म. स. पारखे

★

मराठवाड्यांतील औरंगाबाद व जालना येथें बँकेच्या शाखा पूर्वीच चालू झालेल्या असून नांदेड येथें दि. १५ नोव्हेंबर पासून सुरू झाली आहे.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

टेलिफोन नं. २४८३ "तारेचा पत्ता CENCOBANK"

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोंत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.

| | |
|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. १,७३,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,०७,९४,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.